# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:07.09.2025** **वारःरविवार**

---

- पंतप्रधान नरेंद्र मोदीं आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यात आंतरराष्ट्रीय प्रादेशिक मुद्द्यांवर दूरध्वनीवरून चर्चा
- ऑपरेशन सिंदूरमुळे भारताच्या वेगवान, निर्णायक आणि अचूक प्रहार करण्याची क्षमता सिद्ध झाल्याचं हवाई दल प्रमुखांचं प्रतिपादन
- भारताची रशियन तेलाची खरेदी सुरू राहाणार, राष्ट्रहित सर्वोपरी असल्याचं अर्थमंत्र्यांच प्रतिपादन.
- महाराष्ट्रात दहा दिवसांच्या गणेशोत्सवाची सांगता, सार्वजनिक घरगुती गणपतींना भावपूर्ण वातावरणात निरोप.
- इंग्लंड इथं सुरू असलेल्या जागतिक मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्धा निखत जरीनची विजयी सलामी

**मॅक्रॉनपंप्र**

पंतप्रधान नरेंद्र मोदीं आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यात काल दूरध्वनीवरून आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा पार पडली. यामध्ये युक्रेनमधील संघर्ष लवकर संपवण्यासाठीच्या प्रयत्नांचा समावेश आहे. संघर्षाचं शांततापूर्ण निराकरण आणि शांतता, स्थिरता लवकरच पुनर्स्थापित करण्यासाठी भारताचा सातत्यपूर्ण पाठिंब्याचा पुनरूच्चार पंतप्रधानांची केला. उभय नेत्यांमध्ये काल दूरध्वनीवरून चर्चा झाली. त्यामुळे विविध क्षेत्रातील द्वीपक्षीय सहकार्यातील प्रगतीचा आढावा घेण्यात आला त्याचं मूल्यांकनही केलं. समाज माध्यमांवर जारी केलेल्या संदेशात मोदी यांनी भारत-फ्रान्स यांच्यातील धोरणात्मक भागीदारी जागतिक शांतता आणि स्थिरता वृद्धींगत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत राहील असं नमूद केलं आहे. येत्या फेब्रुवारी महिन्यात भारताने आयोजित केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिणाम परिषदेचे आमंत्रण स्वीकारल्याबद्दल पंतप्रधानांनी मॅक्रॉन यांचे आभारदेखील मानले.

**मोदीट्रंप**

भारत आणि अमेरिका यांच्यात एक अत्यंत सकारात्मक आणि दूरगामी, सर्वसमावेशक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारी आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उभय देशांमधल्या संबंधांबद्दल केलेल्या विधानावर त्यांनी काल समाज माध्यमावर प्रतिक्रिया

दिली आहे. ट्रम्प यांनी अतिशय संवेदनशील आणि सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल मोदी यांनी त्यांचं कौतुक केलं.

**पप्रगयाना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गयानाचे राष्ट्रपती इरफान अली यांचे सर्वसाधारण आणि प्रादेशिक निवडणुकांमध्ये मिळवलेल्या निर्णायक विजयाबद्दल अभिनंदन केलं आहे. पंतप्रधानांनी समाज माध्यमांवरून जारी केलेल्या संदेशात, भारत-गयाना यांच्यादरम्यान बळकट ऐतिहासिक आणि परस्पर नागरीक देवाणघेवाणीव आधारित भागीदारी आणखी भक्कम करण्यासाठी उत्सुक असल्याचं त्यांनी नमूद केलं आहे. पंतप्रधानांच्या या संदेशाला उत्तर देताना गयानाचे अध्यक्ष अली दोन्ही राष्ट्रांमधील आधीपासून भक्कम आणि सौहार्दपूर्ण असलेले संबंध अधिक भक्क करण्याच्या दृष्टीने भारत सरकार आणि भारतीय नागरिकांबरोबर काम करण्यास उत्सुक असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. उभय देशांतील राजकीय संबंध १९६५ पासून सुरू असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली आहे.

**हवाईदलप्रमुख**

ऑपरेशन सिंदूरमुळे भारताच्या वेगवान, निर्णायक आणि अचूक प्रहार करण्याची क्षमता दाखवून दिल्याचं हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी स्पष्ट केलं आहे. चेन्नई इथल्या अधिकारी प्रशिक्षण संस्थेत अर्थात ऑफिसर्स ट्रेनिंग अकादमीमध्ये झालेल्या पासिंग आऊट परेडला संबोधित करताना ते बोलत होते. प्रशिक्षित नवनियुक्त आधिकाऱ्यांना त्यांनी राष्ट्रसेवेत एकतेची भावना कायम ठेवण्याचे आवाहन केले आहे.

**तेलसीतारामन**

भारत यापुढेही रशियाकडून तेल खरेदी करत राहील आणि कोणत्याही निर्णयामागे राष्ट्रहित सर्वोपरी असेल असं ठाम प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. रशियाकडून तेलाची खरेदी असो किंवा अन्य मुद्दा असो, योग्य दर आणि वाहतुकीनुसार आपल्या आवश्यकतांना प्राधान्य दिलं जाईल, असं त्यांनी काल एका मुलाखतीत सांगितलं. नवीन जीएसटी प्रणालीमुळे वस्तूंचा खप वाढेल मात्र त्यामुळे भांडवली खर्चावर काहीही परिणाम होणार नाही, बहुतांश सर्व म्हणजे ९९ टक्के वस्तू आणि सेवा आता शून्य किंवा पाच किंवा १८ टक्के स्लॅब अंतर्गत येतात, असं त्यांनी सांगितलं.

**सीतारामन**

जीएसटी अर्थात वस्तु आणि सेवा कराच्या बादलेल्या रचनांचे फायदे नागरिकांना कसे मिळतील यावर आपण लक्ष ठेवणार असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी म्हटलं आहे. एका माध्यम वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्या बोलत होत्या. लोकांना जर जीएसटीचे फायदे मिळत नसतील तर त्याची माहिती द्यावी असं आवाहनदेखील सीतारमण यांनी केलं आहे.  अनेक उद्योगपतींनी हे फायदे देण्याचे वचन दिलं असून जीएसटी सुधारणांसाठी कामाचे दीर्घ तास आणि नोकरशाही प्रयत्नांची आवश्यकता असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**गणपती**

महाराष्ट्रासह देशात अनेक ठिकाणी काल अनंतचतुर्दशीला घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सवातील गणपतींना भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. पुण्यात मानाचे पाचही गणपती नियोजित वेळेत विसर्जित झाले. ढोल ताशांच्या गजरात आणि पारंपरिक वाद्यांसह तर काही ठिकाणी डिजेच्या तालावर गणपतींचं मोठ्या जल्लोषात विसर्जन करण्यात आलं. पुण्यात राज्यभरातून भाविक मिरवणूक पाहायला दाखल झाले होते. दिल्लीतील महाराष्ट्र सदनात कोल्हापूरच्या सिद्धेश्वर झांज पथकाच्या ढोल-ताशांच्या निनादात गणरायाला निरोप देण्यात आला. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते काल गणेशाची आरती घेण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी लाडक्या बाप्पाचे कुटुंबियांसोबत, पर्यावरणपूरक पद्धतीनं विसर्जन केलं. बाप्पा आपल्या प्रत्येकाच्या मना-मनात सदैव विराजमान असतो आणि त्याचे आशिर्वादही कायम आपल्यासोबत असतात अशा भावना फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केल्या. मुंबईत  लालबागचा राजा , गिरगावचा राजा यांच्या जल्लोषपूर्ण मिरवणुका पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. लालबागचा राजाची शाही विसर्जन मिरवणूक अंतिम टप्प्यात असून पुण्यातही काही सार्वजनिक गणपतींची विसर्जन मिरवणूक अजूनही सुरू आहे.

**इस्रायलहल्ला**

इस्रायलच्या सैन्यानं गाझा शहरातल्या सुसी टॉवर या पंधरा मजली इमारतीवर हल्ला केला आहे. गेल्या चोवीस तासांतला हा दुसरा मोठा हल्ला आहे. या टॉवरचा वापर हमासकडून केला जात असल्याचा दावा इस्रायलच्या संरक्षण दलाने केला आहे. हा दावा पॅलेस्टिनी गटाने फेटाळला आहे. हल्ल्यातील मृतांची संख्या नेमकी स्पष्ट झालेली नाही. पश्चिम गाझा शहरातील १३ मजली मुस्ताहा टॉवर पाडल्यानंतर अवघ्या २४ तासांतच हल्ला झाला आहे.

**महिलाक्रिकेट**

महिलांच्या मर्यादित षटकांच्या  क्रिकेट सामन्यांची विश्वचषक स्पर्धा यंदा भारतात येत्या ऑक्टोबर महिन्यात होणार आहे. ३० सप्टेंबर रोजी गुवाहाटी इथं याचं उद्घाटन होणार असून भारत आणि श्रीलंका या स्पर्धेचे आयोजन करत आहेत.   मात्र उद्घाटन समारंभात पाकिस्तानचा महिला क्रिकेट संघ सहभागी होणार नाही. पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेत कोलंबो इथं खेळवण्यात येणार आहेत.

**टेटे**

अठ्ठाविसाव्या आशियाई टेबल टेनिस संघ अजिंक्यपद स्पर्धेचं आयोजन ११ ते १५ ऑक्टोबरदरम्यान ओडिशात भुवनेश्वर इथं करण्यात येणार आहे. टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडियानं काल ही घोषणा केली. यात पुरुष आणि महिला संघांच्या स्पर्धा होतील. ही स्पर्धा पुढील वर्षीच्या आयटीटीएफ जागतिक संघ अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्रता फेरी ठरणार असून, त्यामध्ये प्रत्येक श्रेणीतील शीर्ष १३ संघांना स्थान मिळेल.

**बॉक्सिंग**

इंग्लंडमधील लिव्हरपूल येथे झालेल्या जागतिक मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्धा निखत जरीनने काल महिलांच्या ५१ किलो वजनी गटात पहिल्या फेरीत विजय मिळवला. वर्षभर दुखापतीमुळे बाहेर राहिलेल्या बिगरमानांकित निखतने जोरदार पुनरागमन करत ३२ व्या फेरीत अमेरिकेच्या जेनिफर लोझानोला ५-० ने हरवले. आता उपांत्यपूर्व फेरीत तिचा सामना जपानच्या युना निशिनाकाशी होईल. तर लव्हलिना बोर्गोहेनला तुर्कीच्या बुसरा इसिलदारकडून, संजूला पोलंडच्या अनेता रायगिल्स्काकडूनही पराभव पत्करावा लागला. तर पुरुषांच्या लढतीत, हितेश गुलियाला नेदरलँड्सच्या फिन रॉबर्ट बॉसकडून पराभव पत्करावा लागला. पहिल्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताने २० सदस्यांचा संघ पाठवला आहे. या चॅम्पियनशिपमध्ये ६५ हून अधिक देशांचे ५५० हून अधिक मुष्टियोद्धे सहभागी झाले  आहेत.

**<u>आशियाकरंडक</u>**

बिहारमधील राजगीर आंतरराष्ट्रीय मैदानावर सुपर फोर फेरीतील शेवटच्या सामन्यात भारतानं काल चीनला ७-० गोल्सनं हरवून आशिया करंडक हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीतप्रवेश केला. आता विजेतेपदासाठी भारत आणि कोरिया यांच्यात आज संध्याकाळी याच मैदानावर सामना होईल. भारतानं चीन संघाविरुद्ध सुरुवातीपासूनच उत्कृष्ट समन्वय आणि आक्रमक खेळ करत वर्चस्व राखलं. भारतीय संघ या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिला आहे.

**<u>हवाईदलबचावमोहिम</u>**

जम्मू आणि काश्मीर तसंच हिमाचल प्रदेशातील भूस्खलन ग्रस्त भागात एक मोठी मानवतवादी मोहीम राबवली आहे. हवाई दलानं समाज माध्यमांवरून एक संदेश प्रसारित केला असून, त्यामध्ये जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूर या भूस्खलनग्रस्त भागात हवाई दलानं जवळपास ६ टन जीवरक्षक खाद्यपुरवठा करण्याची धाडसी मोहिम राबवली आहे. हिमाचल प्रदेशात राबवण्यात आलेल्या १७ तासांच्या मोहिमेमध्ये पाचशे चाळीस लोकांची सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आल्याचं नमूद केलं आहे. या मोहिमांसाठी चार हेलिकॉप्टर आणि ३५ कर्मचारी दिवसरात्र राबत होते अशीही माहिती संदेशात दिली आहे.

**<u>हवामान</u>**

पश्चिम राजस्थान गुजरातमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसासह लाल बावटा हवामान विभागानं जारी केला आहे. वेधशाळेनं वर्तवलेल्या अंदाजानुसार पूर्व राजस्थान, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा होण्याची शक्यता आहे. उर्वरीत देशातही पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**